(२) ज्या व्यक्तीस समन्स पाठवलेले आहे आणि जी मंडळासमोर साक्षीदार म्हणून उपस्थित राहते अशी प्रत्येक व्यक्ती, तिने केलेल्या खर्चासाठी, एखाद्या दिवाणी न्यायालयासमोर उपस्थित राहणाऱ्या साक्षीदारांना भत्ता प्रदान करण्यासाठी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या दरानुसार, भत्ता मिळण्यासाठी हक्कदार असेल.

२८. मंडळाच्या सदस्यांचा पदावधी.- (१) शासकीय सदस्यांव्यतिरिक्त, मंडळाच्या अध्यक्षाचा किंवा सदस्यांचा पदावधी, साधारणपणे, कलम ४२ च्या पोट-कलम (६) अन्वये त्याच्या नियुक्तीच्या, किंवा यथास्थिति, नामनिर्देशनाच्या दिनांकापासून प्रारंभ होणारा तीन वर्षे इतका असेल:

परंतु, असा अध्यक्ष किंवा सदस्य, उक्त तीन वर्षांचा उक्त कालावधी समाप्त झाला असला तरी, त्याच्या उत्तराधिकाऱ्याची नियुक्ती, किंवा यथास्थिति, नामनिर्देशन करण्यात येईपर्यंत, नियमितपणे पद धारण करील.

(२) नैमित्तिक रिक्त पद भरण्यासाठी, नामनिर्देशित केलेला मंडळाचा स्वतंत्र सदस्य, ज्या सदस्याच्या जागी त्या स्वतंत्र सदस्याला नामनिर्देशित केलेले असेल त्या सदस्याच्या पदावधीच्या उर्वरित कालावधीसाठी किंवा नियमित सदस्य पदावर रुजू होईपर्यंत, पद धारण करील.
(३) मंडळाचे शासकीय सदस्य, त्यांच्या जागी, अशा अन्य शासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येईपर्यंत, पद धारण करतील.
(४) पोट-नियम (१), (२) व (३) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मंडळाचे सदस्य, राज्य शासनाची मर्जी असेपर्यंतच्या कालावधीसाठी, पद धारण करतील.

२९. प्रवास भत्ता.- (१) मंडळाच्या शासकीय सदस्याच्या प्रवास भत्याचे, शासकीय कर्तव्यावर असताना केलेल्या प्रवासासाठी त्यांना लागू असलेल्या नियमांनुसार विनियमन करण्यात येईल आणि वेतन प्रदान करणाऱ्या प्राधिकरणाद्वारे तो प्रदान करण्यात येईल.
(२) मंडळाचा किंवा समितीचा अध्यक्ष व प्रत्येक अशासकीय सदस्य, त्याची कर्तव्य करण्याच्या संबंधात त्याने केलेल्या कोणत्याही प्रवासासाठी, राज्य शासनाच्या गट-अ अधिकाऱ्यांना लागू असलेल्या दराने व शर्तींस अधीन राहून, प्रवास व निवास भत्ता आहरित करण्यास हक्कदार असेल.
स्पष्टीकरण.- या नियमाच्या प्रयोजनार्थ, "शासकीय सदस्य" या संज्ञेचा अर्थ, त्या क्षमतेत मंडळाचे सदस्य म्हणून कामकाज पाहणारे नियमित शासकीय अधिकारी, असा आहे आणि "अशासकीय सदस्य" याचा अर्थ, जो शासकीय सदस्य नाही असा सदस्य, असा आहे.

३०. अधिकारी व कर्मचारी.- राज्य शासन, मंडळाच्या कामकाजासाठी त्याला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, सहायक कामगार आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला सचिव तसेच आवश्यक कर्मचारी मंडळास पुरवील.

३१. मंडळाच्या सदस्यांची पुन:नामनिर्देशन करण्याची पात्रता.- एखादा मावळता अशासकीय सदस्य, एकूण दोन पदावधींपेक्षा अधिक नसेल अशा पदावधींसाठी मंडळाच्या सदस्यत्वाकरिता पुन: नामनिर्देशित करण्यास पात्र असेल.

३२. मंडळाचे अध्यक्ष आणि सदस्यांचा राजीनामा.- (१) शासकीय सदस्यांव्यतिरिक्त मंडळाचा सदस्य, अध्यक्षास लेखी नोटीस देऊन त्याच्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊ शकेल आणि अध्यक्ष, राज्य शासनास उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे राजीनामा देऊ शकेल.
(२) त्याची स्वीकृती कळविल्याच्या दिनांकापासून किंवा राजीनाम्याच्या दिनांकापासून तीस दिवस समाप्त झाल्यावर, यापैकी जे आधी घडेल तेव्हापासून राजीनामा अंमलात येईल.
(३) जेव्हा मंडळाच्या सदस्यत्वामध्ये, एखादे पद रिक्त होईल किंवा रिक्त होण्याचा संभव असेल तेव्हा, अध्यक्ष, राज्य शासनास तात्काळ अहवाल सादर करील आणि राज्य शासन, संहितेच्या तरतुदींनुसार रिक्त पद भरण्यासाठी उपायोजना करील.

३३. सदस्यत्वाची समाप्ती.- जर मंडळाचा एखादा सदस्य अध्यक्षास पूर्वसूचना न देता, सलग तीन बैठकींना अनुपस्थित राहिल्यास त्याचे सदस्यत्व संपुष्टात येईल. अध्यक्ष, अशा समाप्तीचा अहवाल, राज्य शासनास सादर करील. ज्या व्यक्तीचे सदस्यत्व संपुष्टात येत आहे त्या व्यक्तीस देखील कळविण्यात येईल.

३४. अपात्रता.- (१) एखादी व्यक्ती,-

(एक) जर तिला एखाद्या सक्षम न्यायालयाने, ती विकल मनाची असल्याचे घोषित केले असेल तर; किंवा

(दोन) जर ती अविमुक्त नादार झाली असेल तर; किंवा

(तीन) जर संहितेच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर, तिला नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधाबद्दल दोषीसिद्ध ठरविण्यात आलेले असेल तर,

तिला, मंडळाची सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यासाठी किंवा होण्यासाठी अपात्र ठरवण्यात येईल.
(२) जर पोट-नियम (१) खालील अपात्रता घडून आलेली आहे किंवा कसे या संबंधात कोणताही प्रश्न उद्भवला तर, त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

प्रकरण-पाच
देणी, हक्क मागण्या, इत्यादींचे प्रदान.

३५. कलम ४४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) खालील प्रदान.- (१) (क) प्रत्येक कर्मचारी, त्याच्या खात्यात जमा असणारी रक्कम, प्रदेय झाली असेल त्यापूर्वी किंवा जेव्हा रक्कम प्रदेय झाली असेल तेव्हा, ती प्रदान करण्यात येण्यापूर्वी, त्याचा मृत्यू झाल्यास, अशा प्रसंगी त्याच्या खात्यात जमा असलेली रक्कम मिळण्याचा हक्क प्रदान करणाऱ्या व्यक्तीला नामनिर्देशित करणारे **नमुना- सात** मधील घोषणापत्र प्रत्यक्षपणे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करील.

(ख) जर नामनिर्देशन करण्याच्या वेळी कर्मचाऱ्यास कुटुंब असेल तर, पतीच्या किंवा पत्नीच्या नावाने अथवा पतीला किंवा पत्नीला अधिमान्यता देऊन त्यानंतर त्याच्या कुटुंबातील एक किंवा अधिक सदस्यांच्या नावे नामनिर्देशन करण्यात येईल:

परंतु, कुटुंब असणाऱ्या कर्मचाऱ्याने, त्याच्या कुटुंबातील सदस्यांव्यतिरिक्त एखाद्या व्यक्तीच्या नावाने केलेले नामनिर्देशन अवैध ठरेल:

परंतु आणखी असे की, कर्मचाऱ्याचा विवाह झाल्यानंतर, त्याच्या पत्नीच्या/पतीच्या नावाचा समावेश असलेले, त्याच्या/तिच्या नामनिर्देशितींना प्रदेय असलेली रक्कम किंवा हिस्सा विनिर्दिष्ट करणारे नवीन नामनिर्देशन करण्यात येईल. अशा विवाहापूर्वी केलेले नामनिर्देशन रद्द असल्याचे मानण्यात येईल.

(ग) जेव्हा एखाद्या अज्ञान व्यक्तीचे नामनिर्देशन संपूर्णत: किंवा अंशत: केले जाते, तेव्हा कर्मचाऱ्यास, त्याच्या कुटुंबातील सज्ञान व्यक्तीस नामनिर्देशित व्यक्तीस पालक म्हणून नियुक्त करता येईल अथवा जेव्हा कुटुंबामध्ये कोणतीही सज्ञान व्यक्ती नसेल तेव्हा, त्यास, त्याच्या स्वेच्छा अधिकारात, अन्य कोणत्याही व्यक्तीस अज्ञान नामनिर्देशित व्यक्तीची पालक म्हणून नियुक्ती करता येईल.

(घ) जर कर्मचाऱ्याने, एकापेक्षा अधिक व्यक्तींना नामनिर्देशित केले असेल तर, तो, त्याच्या खात्यात जी जमा असेल त्या संपूर्ण रकमेची विल्हेवाट करता यावी म्हणून, त्याच्या स्वेच्छा अधिकारात, त्याच्या प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तींना प्रदेय असलेली रक्कम किंवा हिस्सा नामनिर्देशनामध्ये, विनिर्दिष्ट करील.

(२) जेव्हा संहितेअन्वये एखाद्या कर्मचाऱ्यास देय असलेली कोणतीही रक्कम, त्याचा मृत्यू झाल्यानंतर किंवा त्याचा ठावठिकाणा लागत नसेल अशा कारणावरून देय होते तेव्हा, आणि रक्कम प्रदेय झाली असेल त्या दिनांकापासून तीन महिने समाप्त होईपर्यंत कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तींना रक्कम प्रदान करता येऊ शकत नसेल तेव्हा, नियोक्त्याद्वारे, अशी रक्कम अधिकारिता असणाऱ्या सहायक कामगार आयुक्ताकडे जमा करण्यात येईल, तो, अशी रक्कम, त्याच्याकडे ती अशा प्रकारे ज्या दिनांकास जमा केली होती त्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत, कर्मचाऱ्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींची ओळख पटवल्यानंतर, त्यांना संवितरित करील.

३६. कलम ४४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) खालील संवितरित न केलेल्या देय रकमा जमा करणे.- (१) जेव्हा संहितेअन्वये एखाद्या कर्मचाऱ्यास प्रदेय असलेली कोणतीही रक्कम, एकतर अशा कर्मचाऱ्याकडून कोणालाही नामनिर्देशित करण्यात आलेले नाही या कारणावरून किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी, संवितरित न करता राहिलेली असेल तेव्हा, अशी रक्कम प्रदेय झाली असेल त्या दिनांकापासून सहा महिने समाप्त होईपर्यंत कर्मचाऱ्याच्या कोणत्याही नामनिर्देशित व्यक्तीस प्रदान केली जाऊ शकत नाही, अशा सर्व रकमा, नियोक्त्याकडून, सहा महिन्यांच्या उक्त कालावधीच्या अखेरच्या दिवसानंतर पंधरा दिवस समाप्त होण्यापूर्वी आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिकारिता असणाऱ्या सहायक कामगार आयुक्ताकडे जमा करण्यात येतील.

(२) पोट-नियम (१) अन्वये जमा करावयाची रक्कम, नियोक्त्याकडून, बँक हस्तांतरणामार्फत किंवा अधिकारिता असणाऱ्या अशा सहायक कामगार आयुक्ताच्या नावे काढलेल्या भारतातील कोणत्याही अनुसूचित बँकेकडून घेतलेल्या रेखांकित धनाकर्षामार्फत, जमा करण्यात येईल.

३७. कलम ४४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) खालील संवितरित न केलेल्या देय रकमांसंबंधी कार्यवाही करण्याची रीत.- (१) अधिकारिता असणाऱ्या सहायक कामगार आयुक्ताकडे जमा केलेली, नियम ३६ च्या पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली रक्कम (या नियमांमध्ये, यात यापुढे जिचा निर्देश, "रक्कम" असा केला आहे), त्याच्याकडे राहील आणि ती, राज्य शासनाच्या रोख्यांमध्ये गुंतवण्यात येईल अथवा एखाद्या राष्ट्रीयकृत बँकेमध्ये नियत ठेव म्हणून जमा करण्यात येईल.

(२) राज्य शासनाने नियुक्त केलेला प्राधिकारी, शक्य होईल तितक्या लवकर, त्यास पर्याप्त वाटेल असा, रकमेशी संबंधित असेल असा तपशील अंतर्भूत असणारी नोटीस, किमान पंधरा दिवसाच्या आत, माहितीसाठी सूचना फलकावर प्रदर्शित करील आणि अशी नोटीस, राज्य शासनाच्या संकेतस्थळावर किंवा शासकीय राजपत्रामध्ये देखील प्रसिद्ध करील तसेच संवितरित न केलेले वेतन ज्या क्षेत्रामध्ये अर्जित केले होते त्या क्षेत्रामधील सर्वसाधारणपणे समजल्या जाणाऱ्या देशी भाषेतील कोणत्याही दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये देखील प्रसिद्ध करील आणि कर्मचारी कायमस्वरूपी राहत असलेल्या क्षेत्रामध्ये देशी भाषेतील कोणत्याही दोन वृत्तपत्रांमध्ये देखील प्रसिद्ध करील.

(३) पोट-नियम (४) च्या तरतुदीस अधीन राहून, अधिकारिता असणारा सहायक कामगार आयुक्त, नामनिर्देशित व्यक्तीला, किंवा यथास्थिति, जिने अशा रकमेची हक्कमागणी केलेली आहे त्या व्यक्तीला, बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, अधिकारिता असणाऱ्या अशा सहायक कामगार आयुक्ताने जिच्या नावे रक्कम प्रदान करण्याचा निर्णय दिला असेल त्या व्यक्तीला, रक्कम देईल.
(४) जर संवितरित न केलेली रक्कम, प्रसिद्धीनंतर सात वर्षांच्या कालावधीसाठी हक्कमागणी न करता राहिलेली असेल तर, या बाबतीत, राज्य शासन, वेळोवेळी निर्देश देईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रकरण - सहा
नमुने, नोंदवह्या व वेतन चिठ्ठी.

३८. हक्क मागणीच्या एकल अर्जाचा नमुना.- (१) एकाच आस्थापनेत काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही संख्येच्या किंवा गटाच्या वतीने किंवा बाबतीत, ज्यामध्ये एकाच वेतन कालावधीशी संबंधित असलेल्या त्यांच्या हक्क मागण्या किंवा भेदभावाच्या कोणत्याही घटना असलेला एकच अर्ज, नमुना दोनमध्ये, विनिर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांसह, संहितेच्या तरतुदींन्वये उद्भवणाऱ्या हक्क मागण्यांची सुनावणी करण्याकरिता व त्या निर्धारित करण्यासाठी कलम ४५ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या प्राधिकरणासमोर, प्रत्यक्षपणे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उक्त नमुन्यामध्ये कलम ४५ च्या पोट-कलम (५) अन्वये दाखल करता येईल.
(२) कलम ४५ च्या पोट-कलम (५) खालील अर्ज प्राप्त झाल्यावर, प्राधिकरण, सर्व संबंधित दस्तऐवज व साक्षीदार, कोणतेही असल्यास, यांसह नमुना आठच्या भाग -अ मधील नोटीसमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास त्याच्यासमोर हजर राहण्यासाठी ती नोटीस, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा शीघ्र डाकेने नियोक्त्यावर बजावील आणि असा विनिर्दिष्ट केलेला दिनांक अर्जदारास कळवील.
(३) जर नियोक्ता किंवा त्याचा प्रतिनिधी, विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास हजर राहण्यास कसूर करील तर, प्राधिकरण, अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व निर्णय घेईल.
(४) अर्जदार किंवा त्याचा प्रतिनिधी कोणतेही वाजवी कारण आगाऊ सादर न करता नमूद केलेल्या तारखेस अनुपस्थित राहिल्यास, प्राधिकरण अर्ज फेटाळू शकते.

३९. अपील.- (१) कलम ४५ च्या पोट-कलम (२) अन्वये प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, **नमुना-तीन** मध्ये अपीलकाराने नमूद केलेल्या दस्तऐवजांसह इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा शीघ्र डाकेने, अधिकारिता असणाऱ्या अपील प्राधिकाऱ्याकडे, कलम ४९ च्या पोट-कलम (१) अन्वये उक्त नमुन्यामध्ये अपील दाखल करता येईल:

परंतु, जर अपीलकाराने अपील दाखल करण्याच्या वेळी, हक्क मागणी केलेली रक्कम, अपिलीय प्राधिकाऱ्याकडे जमा केलेली नसेल तर, नियोक्त्याने केलेले कोणतेही अपील, दाखल करून घेण्यात येणार नाही.

(२) जेव्हा कलम ४९ च्या पोट-कलम (१) खालील अपील दाखल करून घेतले जाते तेव्हा, अपिलीय प्राधिकारी, नोटीसीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास, त्याच्यासमोर उपस्थित राहण्यासाठी **नमुना-आठच्या भाग- ब** मधील नोटीस, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा शीघ्र डाकेने प्रतिवादीस बजावील आणि अशा प्रकारे विनिर्दिष्ट केलेला दिनांक अपीलकाराला कळवील.
(३) अपिलीय प्राधिकारी, अपीलकाराची व प्रतिवादीची सुनावणी घेतल्यानंतर, आदेशाद्वारे अपीलावर निर्णय करील.
(४) जेव्हा नियोक्ता किंवा त्यांचा प्रतिनिधी, विनिर्दिष्ट तारखेला हजर राहण्यात कसूर करील तेव्हा त्याबाबत, प्राधिकरण, अर्जाची एकतर्फी सुनावणी घेईल व त्यावर निर्णय करील.
(५) जेव्हा अर्जदार किंवा त्यांचा प्रतिनिधी, विनिर्दिष्ट तारखेला हजर राहण्यात कसूर करील तेव्हा त्याबाबत, प्राधिकरण, अपील खारीज करू शकेल.

४०. नोंदवह्यांचा नमुना.- (१) ज्या आस्थापनेस ही संहिता लागू होते, त्या आस्थापनेचा प्रत्येक नियोक्ता, संहितेच्या कलम ५० च्या पोट-कलम (१) अन्वये, या नियमांसोबत जोडलेल्या नमुन्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा भौतिक स्वरूपात पुढील नोंदवह्या ठेवील:—
(एक) नमुना एक मध्ये कर्मचारी नोंदवही,
(दोन) नमुना चार मध्ये वेतन, अतिकालिक वेतन, दंड आणि नुकसान व हानीसाठी वजावटी यांची नोंदवही,
(तीन) नमुना नऊ मध्ये उपस्थिती नोंदवही-नि-हजेरी पत्रक.
(२) कलम १९ च्या पोट-कलम (८) मध्ये निर्दिष्ट केलेले सर्व दंड व त्यांची सर्व वसुली, या नियमांसोबत जोडलेल्या नमुना चार मध्ये, नियोक्त्याने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा भौतिक स्वरूपात ठेवावयाच्या नोंदवहीत नोंदविण्यात येईल, आणि उक्त पोट-कलम (८) मध्ये निर्दिष्ट केलेला प्राधिकारी, महाराष्ट्र राज्याचा कामगार आयुक्त असेल.

(३) कलम २१ च्या पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सर्व कपाती व त्यांची सर्व वसुली, या नियमांसोबत जोडलेल्या नमुना चार मध्ये, नियोक्त्याने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा भौतिक स्वरूपात ठेवावयाच्या नोंदवहीत नोंदविण्यात येईल.
(४) या नियमांन्वये ठेवणे आवश्यक असलेल्या सर्व नोंदवह्या, त्यामधील शेवटची नोंद केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी जतन करून ठेवण्यात येतील.

४१. वेतन चिठ्ठी.- प्रत्येक नियोक्ता, संहितेच्या कलम ५० च्या पोट-कलम (३) अन्वये, वेतन देण्याच्या दिवशी किंवा त्यापूर्वी, कर्मचाऱ्यांना, नमुना चार मध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा अन्य प्रकारे वेतन चिठ्ठ्या देईल.

४२. कलम ५६ च्या पोट-कलम (१) अन्वये अपराधांचे प्रशमन करण्याची रीत.- (१) कलम ५६ च्या पोट-कलम (१) अन्वये अपराधांचे प्रशमन करण्यास इच्छुक असलेली आरोपी व्यक्ती, उक्त पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित केलेल्या राजपत्रित अधिकाऱ्याकडे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा प्रत्यक्षपणे **नमुना-सहा च्या भाग - अ मध्ये** अर्ज करू शकेल.
(२) पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला राजपत्रित अधिकारी, असा अर्ज प्राप्त झाल्यावर, असा अपराध संहितेअन्वये प्रशमन करण्यायोग्य आहे किंवा नाही यासंबंधी स्वतःची खात्री करील आणि जर अपराध प्रशमन करण्यायोग्य असेल आणि आरोपी व्यक्ती प्रशमन करण्यास सहमत असेल तर, अशा अधिकाऱ्याने काढलेल्या प्रशमन आदेशाच्या तीस दिवसांच्या आत, आरोपीने प्रदान करावयाच्या, संहितेअन्वये अशा अपराधासाठी तरतूद केलेल्या कमाल दंडाच्या पन्नास टक्के रकमेस अपराधाचे प्रशमन करील.
(३) प्रशमन अधिकारी, प्रशमनाची रक्कम मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत, प्रशमन नोटीसीचे अनुपालन करताना ज्या व्यक्तीकडून अशी रक्कम प्राप्त झालेली आहे, अशा व्यक्तीला **नमुना सहाच्या भाग-ब** मध्ये प्रशमन प्रमाणपत्र देईल.
(४) जेव्हा अशी नोटीस दिलेली व्यक्ती, प्रशमन अधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत प्रशमनाची रक्कम जमा करण्यास निष्फळ ठरली असेल तेव्हा अशा बाबतीत, ज्या अपराधाच्या बाबतीत प्रशमनाची नोटीस काढण्यात आली होती, अशा अपराधासाठी अशा व्यक्तीविरुद्ध सक्षम न्यायालयात खटला दाखल करण्यात येईल.
(५) जेव्हा खटला दाखल केल्यानंतर, पोट-नियम (२) अन्वये अपराधाचे प्रशमन करण्यात आलेले असेल तेव्हा, अधिकारी, त्याने दिलेल्या अशा आदेशाची प्रत, कलम ५६ च्या पोट-कलम (६) अन्वये करण्याची गरज असलेल्या कारवाईसाठी कलम ५३ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याच्या माहितीसाठी पाठवील.

प्रकरण- सात
संकीर्ण

४३. वेतन प्रदान.- जेव्हा कर्मचारी, एखाद्या आस्थापनेमध्ये कंत्राटदारामार्फत काम करीत असतील तेव्हा, कंपनी किंवा भागीदारी संस्था किंवा संघ अथवा जी आस्थापनेचा मालक आहे अशी अन्य कोणतीही व्यक्ती, संहितेच्या तरतुदींनुसार कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या बाबतीत, त्याने किंवा तिने प्रदेय असलेल्या वेतनाची रक्कम, कंत्राटदारास प्रदान करील.

स्पष्टीकरण.- या नियमाच्या प्रयोजनार्थ, "भागीदारी संस्था" या संज्ञेस, भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ (१९३२ चा ९) यामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

४४. बोनस प्रदान करण्याची जबाबदारी.- जेव्हा एखाद्या आस्थापनेमध्ये कर्मचारी, कंत्राटदारामार्फत नोकरीवर असतील आणि कंत्राटदार, कलम २६ अन्वये त्यांना बोनस प्रदान करण्यास कसूर करील तेव्हा, कंपनी किंवा भागीदारी संस्था किंवा संघ अथवा कलम ४३ च्या परंतुकामध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे अन्य व्यक्ती, कर्मचाऱ्यांनी किंवा कोणत्याही नोंदणीकृत श्रमिक संघाने किंवा कर्मचारी ज्यांचे सदस्य आहेत अशा संघाने दिलेली अशा कसुरीची लेखी माहिती मिळाल्यावर आणि अशा कसुरीची खात्री केल्यावर, कर्मचाऱ्यांना अशा किमान बोनसचे प्रदान करील.

४५. वार्षिक विवरण.- या नियमांखालील विवरण, ज्या आस्थापनांना ही संहिता लागू होते त्या आस्थापनेच्या प्रत्येक नियोक्त्याने, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२० (२०२० चा ३७) अन्वये केलेल्या नियमांमध्ये अशा प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यामध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करण्यात येतील.

नमुना- एक (नियम ४०(१) (एक) पहा)	
कर्मचारी नोंदवही	
आस्थापनेचे नाव:	
नियोक्त्याचे नाव:	
मालकाचे नाव:	
नियोक्त्याचा PAN/TAN:	
आस्थापनेचा नोंदणी क्रमांक (कामगार ओळख क्रमांक (LIN) हा आस्थापनेचा नोंदणी क्रमांक असेल)	
१.	कर्मचारी संकेतांक
२.	नाव
३.	आडनाव
४.	लिंग
५.	वडिलांचे/आईचे/ पतीचे किंवा पत्नीचे नाव
६.	जन्मतारीख
७.	जन्मस्थान
८.	राष्ट्रीयत्व
९.	शैक्षणिक स्तर
१०.	रुजू होण्याची तारीख
११.	पदनाम
१२.	प्रवर्ग (HS/S/SS/US)*
१३.	रोजगाराचा प्रकार (P/T/FT/T/B)**
१४.	पदस्थापनेचे तपशील
१५.	वेतन
१६.	पदोन्नती
१७.	भ्रमणध्वनी क्रमांक
१८.	सार्वत्रिक खाते क्रमांक (UAN)
१९.	पॅन (PAN)
२०.	नामनिर्देशित व्यक्ती (नामनिर्देशन नमुन्याच्या आधारे भरावयाचे)
२१.	कुटुंबाचा तपशील
२२.	EPS/NPS
२३.	ESIC IP क्रमांक
२४.	आधार क्रमांक
२५.	बँक खात्याचा क्रमांक
२६.	बँकेचे नाव

२७.	शाखा (IFSC)
२८.	सध्याचा पत्ता
२९.	कायमचा पत्ता
३०.	सेवा पुस्तिका क्रमांक
३१.	बाहेर पडल्याची तारीख
३२.	बाहेर पडल्याचे कारण
३३.	ओळख चिन्ह
३४.	छायाचित्र
३५.	नमुना स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा
३६.	शेरे

-

* HS/S/SS/US= अतिकुशल / कुशल / अर्धकुशल/ अकुशल

** P/T/FT/T/B=कायमस्वरूपी / तात्पुरते / निश्चित मुदती / प्रशिक्षणार्थी / बदली

नमुना- दोन

(नियम ३८(१) पहा)

[कलम ४५ च्या पोट-कलम (५) खालील एकल अर्ज]

वेतन संहिता, २०१९ (२०१९ चा २९) याच्या कलम ४५(१) अन्वये नियुक्त केलेल्या प्राधिकाऱ्यासमोर

_____करिता क्षेत्र: _____

अर्ज क्रमांक: २०___चा _____

ए.बी.सी. आणि (क्रमांक नमूद करा) _____इतर ....अर्जदार

(संबंधित कर्मचारी/नोंदणीकृत कामगार संघटना/निरीक्षक-नि-सुविधाकार यांच्यामार्फत)

पत्ता: .....

आणि

एक्स. वाय. झेड.....प्रतिवादी

पत्ता: .....

अर्जामध्ये पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे:

(१) ज्याचे/ज्यांची नाव (नावे) सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये दर्शविलेली आहे/आहेत तो अर्जदार (ते अर्जदार), _____पासून _____पर्यंत _____(प्रवर्ग) म्हणून _____(आस्थापना) येथे काम करीत होता/होती/होते/होत्या. श्री/ श्रीमती_____हा/ही, जे काम/जी कामे, वेतन संहिता, २०१९ मध्ये समाविष्ट आहे/ आहेत ते काम/कामे _____(कामाचे स्वरूप) करीत आहे.

(२) प्रतिवादी (प्रतिवादी) हा/हे, वेतन संहिता, २०१९ याच्या कलम २(१) च्या अर्थानुसार नियोक्ता आहे/नियोक्ते आहेत.

(३) (क) अर्जदारास (अर्जदारांना), त्याच्या (त्यांच्या) प्रवर्गासाठी निश्चित केलेल्या किमान वेतन दरापेक्षा _____पासून _____पर्यंतच्या कालावधीसाठी प्रति दिवस रू. _____ इतके कमी वेतन प्रदान केलेले आहे/ प्रदान करण्यात आलेले आहे.

(ख) अर्जदारास (अर्जदारांना), साप्ताहिक सुट्टीच्या दिवसांसाठी प्रति दिवस रू. _____ इतके वेतन प्रदान केलेले नाही/ प्रदान करण्यात आलेले नाही.

(ग) अर्जदारास (अर्जदारांना), _____पासून _____पर्यंतच्या कालावधीसाठी अतिकालिक दराने (दरांनी) वेतन प्रदान केलेले नाही/ प्रदान करण्यात आलेले नाही.

(घ) अर्जदारास (अर्जदारांना), _____पासून _____पर्यंतच्या कालावधीसाठी वेतन प्रदान केलेले नाही/ प्रदान करण्यात आलेले नाही.

(ङ) अर्जदाराच्या (अर्जदारांच्या) वेतनातून (वेतनांतून), या अर्जासोबत जोडलेल्या जोडपत्रांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तपशिलानुसार, संहितेचे उल्लंघन करून कपाती करण्यात आलेल्या आहेत.

(च) अर्जदारास (अर्जदारांना), _____ लेखांकन वर्षाकरिता किमान बोनस प्रदान केलेले नाही/ प्रदान करण्यात आलेले नाही.

(छ) अर्जदाराचा (अर्जदारांचा), त्याच नियोक्त्याकडून, त्याच प्रकारच्या कामाच्या किंवा त्याच स्वरूपाच्या कामाच्या बाबतीत, वेतनाशी संबंधित असणाऱ्या बाबींमध्ये लिंगाच्या आधारे भेदभाव करण्यात आलेला आहे.

(४) अर्जदाराने (अर्जदारांनी), प्रत्येक रकमेवर मागितलेल्या दिलास्याचे मूल्य, त्याने/ तिने खालीलप्रमाणे अंदाजित केलेले आहे:

(क) रुपये.....

(ख) रुपये.....

(ग) रुपये.....

(घ) रुपये.....

(ङ) रुपये.....

(च) रुपये.....

(छ)रुपये.....

एकूण रुपये.....

(५) म्हणून, अर्जदार (अर्जदार) अशी प्रार्थना करतो (करतात) की, पुढील बाबतीत, वेतन संहिता, २०१९ याच्या कलम ४५ (२) अन्वये निर्देश द्यावेत:-

(क) संहितेनुसार प्रदेय वेतन आणि प्रत्यक्षात प्रदान केलेले वेतन यामधील फरकाचे प्रदान.

(ख) साप्ताहिक सुट्टीच्या दिवसांच्या परिश्रमिकाचे प्रदान.

(ग) अतिकालिक दराने वेतनाचे प्रदान.

(घ) ..... ते ..... या कालावधीसाठी वेतन प्रदान करणे.

(ङ) संहितेचे उल्लंघन करून करण्यात आलेल्या वजावटींचे प्रदान करणे,

(च) ..... या लेखा वर्षासाठी किमान बोनसचे प्रदान करणे.

(छ) लिंगभेदामुळे उद्भवलेल्या वेतनाच्या थकबाकीचे प्रदान करणे.

(ज) रुपये ..... इतकी नुकसान भरपाई.

(६) अर्जदार (अर्जदार) याद्वारे, दृढतापूर्वक असे घोषित करतो/करतात की, या अर्जातील सर्व तथ्ये, त्याच्या /त्यांच्या ज्ञानानुसार, विश्वासानुसार व माहितीनुसार, खरी आहेत.

दिनांक: _____

काम करीत असलेल्या व्यक्तीची (व्यक्तींची)/नोंदणीकृत श्रमिक संघाच्या यथोचित प्राधिकृत केलेल्या पदाधिकाऱ्याची /निरीक्षक-नि-सुविधाकाराची स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा

टीप: अर्जदारास (अर्जदारांना), जर आवश्यक असेल तर, या अर्जासोबत तपशील अंतर्भूत असणारी जोडपत्रे जोडता येतील.

नमुना- तीन

(नियम ३९(१) पहा)

वेतन संहिता, २०१९ याच्या कलम ४९ (१) खालील अपील.

वेतन संहिता, २०१९ या खालील अपिलीय प्राधिकाऱ्यासमोर

ए.बी.सी. .....अपीलकार

पत्ता: .....

आणि

एक्स. वाय. झेड.....प्रतिवादी.

पत्ता: .....

अपीलाचे तपशील:

१. ज्या आदेशाविरुद्ध अपील केले आहे त्या आदेशाचे तपशील:

आदेश क्रमांक व दिनांक: _____

ज्याने विवादित आदेश पारित केला आहे तो प्राधिकारी: _____

निवाडा दिलेली रक्कम: _____

निवाडा दिलेली कोणतीही असल्यास, नुकसानभरपाई: _____

२. प्रकरणाची तथ्ये:

(*येथे तथ्यांचे संक्षिप्त विवरण, कालानुक्रमे, द्यावे, शक्य असेल तेथवर, प्रत्येक परिच्छेदात एक स्वतंत्र मुद्दा किंवा तथ्य अंतर्भूत असावे.*)

३. अपीलाची कारणे:

४. इतर कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही अपीलीय प्राधिकरणासमोर आधीपासून प्रकरणे दाखल केलेली नाहीत किंवा प्रलंबित नाहीत:

अपीलकार आणखी असेही घोषित करतो की, ज्या बाबतीत हे अपील करण्यात आलेले आहे त्या प्रकरणाशी संबंधित असणारे कोणतेही अपील, रिट याचिका किंवा दावा कोणत्याही न्यायालयात किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणासमोर किंवा अपिलीय प्राधिकरणासमोर यापूर्वी दाखल केलेला नाही किंवा प्रलंबित नाही अथवा त्यांच्यापैकी कोणाहीसमोर असे कोणतेही अपील, रिट याचिका किंवा दावा प्रलंबित नाही.

५. मागितलेला दिलासा:

वर नमूद केलेली तथ्ये विचारात घेता, अपीलकार, पुढील दिलासा (दिलासे) मिळण्याची प्रार्थना करीत आहे:- (मागितलेला दिलासा (दिलासे) खाली विनिर्दिष्ट केलेला आहे (केलेली आहेत)

६. सहपत्रांची यादी:

१.

२.

३.

४.

.....

दिनांक: _____

ठिकाण: _____

अपीलकाराची स्वाक्षरी.

.....

कार्यालयीन वापरासाठी

दाखल केल्याचा दिनांक किंवा /

टपालाने प्राप्त झाल्याचा दिनांक: _____

नोंदणी क्रमांक: _____

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता.

नमुना-चार

(नियम १७ आणि नियम ४०(१)(दोन) पहा)

वेतन, अतिकालिक भत्ता, आगाऊ रक्कम, दंड आणि हानी/ नुकसानीसाठी केलेल्या कपाती यांची नोंदवही

आस्थापनेचे नाव	
नियोक्त्याचे नाव	
मालकाचे नाव	
नियोक्त्याचा PAN/ TAN	
आस्थापनेचा नोंदणी क्रमांक (आस्थापनेचा नोंदणी क्रमांक हा, कामगार ओळख क्रमांक (LIN) असेल)	

अ. क्र.	कर्मचारी नोंदवहीतील अनुक्रमांक/ कर्मचारी संकेतांक	कर्मचाऱ्याचे नाव	पदनाम	विभाग	वेतन प्रदानाचा कालावधी (मासिक/पंधरवड्याने/साप्ताहिक/दैनिक/ उक्त्या दराने)	वेतन कालावधी पासून पर्यंत	वेतन कालावधीमध्ये काम केलेल्या दिवसांची एकूण संख्या	काम केलेले एकूण अतिकालिक तास किंवा उक्ते काम करणाऱ्या कामगारांच्या बाबतीत अतिकालिक उत्पादन	वेतनदर			
									मूळ वेतन	महागाई भत्ता		भत्ते
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)		(१२)

अर्जित केलेल्या वेतनाची रक्कम					कपाती										निव्वळ वेतन
मूळ वेतन	महागाई भत्ता	भते	अतिकालिक वेतन	अर्जित केलेले एकूण वेतन	इपीएफ	इएसआयसी	सोसायटी	आयकर	विमा	अग्रीम रकमा	दंडाची वसुली	नुकसानीची/ हानीची वसुली	एकूण वजावटी	इतर	
(१३)	(१४)	(१५)	(१६)	(१७)	(१८)	(१९)	(२०)	(२१)	(२२)	(२३)	(२४)	(२५)	(२६)	(२७)	(२८)

वेतन प्रदानाची तारीख	कर्मचाऱ्याकडून /बँकेकडून मिळाली. संव्यवहार ओळख क्रमांक (transaction ID)	ज्याकरिता दंड लादलेला आहे त्या कृत्यांचे किंवा अकृत्यांचे स्वरूप दिनांक	लादलेल्या दंडाची रक्कम	कर्मचाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे किंवा कसुरीमुळे नियोक्त्याला झालेले नुकसान किंवा हानी	नियोक्त्याची/नियोक्त्याच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी
(२९)	(३०)	(३१)	(३२)	(३३)	(३४)

टीप: *नोंदवही प्रत्यक्ष स्वरूपात ठेवलेली असल्यास, स्वाक्षरी आवश्यक असेल.*

नमुना- पाच (नियम ४१ पहा)	
वेतन चिट्ठी	
दिल्याची तारीख: ___	
आस्थापनेचे नाव: _____	
पत्ता: _____	
कालावधी (Period): _____	
१.	कर्मचाऱ्याचे नाव
२.	वडिलांचे/आईचे/ पतीचे किंवा पत्नीचे नाव
३.	पदनाम
४.	UAN (सार्वत्रिक लेखा क्रमांक)
५.	बँक खाते क्रमांक
६.	वेतन कालावधी (Wage Period)
७.	प्रदेय असलेल्या वेतनाचा दर
	(क) मूळ वेतन
	(ख) महागाई भत्ता
	(ग) भत्ते
८.	एकूण उपस्थिती/केलेल्या कामाचे एकक
९.	अतिकालिक वेतन
१०.	एकूण प्रदेय वेतन
११.	एकूण कपाती
	(क) पीएफ (PF)
	(ख) ईएसआय (ESI)
	(ग) इतर (Others)
१२.	प्रदान केलेले निव्वळ वेतन
	नियोक्त्याची / वेतन देणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी

टीप: *नोंदवही प्रत्यक्ष स्वरूपात ठेवलेली असल्यास, स्वाक्षरी आवश्यक असेल.*

नमुना- सहा

भाग - अ

(नियम ४२(१) पहा)

अपराधाचे प्रशमन करण्यासाठी कलम ५६ च्या पोट-कलम (४) खालील अर्ज

१. अर्जदाराचे नाव:

.....

२. वडिलांचे / पत्नीचे किंवा पतीचे नाव:

.....

३. अर्जदाराचा पत्ता:

.....

.....

.....

४. अपराधाचा तपशील:

.....

.....

.....

.....

.....

५. ज्या कलमाखाली अपराध केलेला आहे ते संहितेचे कलम:

.....

.....

६. संहितेअन्वये अपराधासाठी तरतूद केलेला कमाल दंड:

.....

.....

७. अर्जदाराविरुद्ध खटला प्रलंबित आहे किंवा नाही:

☐ होय

☐ नाही

(होय असल्यास, तपशील नमूद करावा)

.....

८. अर्जदाराचा हा पहिला अपराध आहे किंवा कसे, अथवा अर्जदाराने यापूर्वी इतर कोणताही अपराध केलेला आहे किंवा कसे? जर केलेला असल्यास, पूर्वीच्या अपराधाचा संपूर्ण तपशील द्यावा:

.....

.....

.....

.....

९. अर्जदारास द्यावयाची इच्छा असलेली इतर कोणतीही माहिती:

.....

.....

.....

.....

दिनांक: _____

अर्जदार

(नाव व स्वाक्षरी)

भाग - ब

(नियम ४२(३) पहा)

प्रशमन प्रमाणपत्र

संदर्भ: नोटीस क्रमांक:..... दिनांक:

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, ज्या अपराधाच्या बाबतीत, श्री.....(अर्जदार), ...(आस्थापनेचे नाव आणि नोंदणी क्रमांक) चा नियोक्ता यास नोटीस क्रमांक.....दिनांक: .....बजावण्यात आली होती, तो कलम ५४ च्या पोट-कलम ..... खालील अपराध, उक्त नोटीसच्या पूर्ततेसाठी अपराधाचे प्रशमन करण्याकरिता रुपये .....(रुपये _____) इतकी संपूर्ण रक्कम प्रदान केल्यामुळे प्रशमन करण्यात आले आहे.

(सही)

अधिकाऱ्याचे नाव व पदनाम

दिनांक:

ठिकाण:

प्रति:

.....(नियोक्ता/आस्थापना)

.....(नाव आणि नोंदणी क्रमांक)

.....(पत्ता)

नमुना- सात

(नियम ३५(१) (क) पहा)

नामनिर्देशन नमुना

१. नामनिर्देशन करणाऱ्या व्यक्तीचे नाव

२. वडिलांचे / पत्नीचे किंवा पतीचे नाव:

३. जन्मतारीख:

४. लिंग:

५. वैवाहिक स्थिती:

६. पत्ता:
कायमचा पत्ता:
तात्पुरता पत्ता:

माझा मृत्यू झाल्याच्या प्रसंगी, नियोक्त्याकडून मला देय असलेली कोणतीही रक्कम मिळण्यासाठी, मी, याद्वारे, व्यक्तीला (व्यक्तींना) नामनिर्देशित करीत आहे/ पूर्वी केलेले नामनिर्देशन रद्द करीत आहे आणि खालील व्यक्तीला (व्यक्तींना) नामनिर्देशित करीत आहे:-

नामनिर्देशित व्यक्तीचे/ नामनिर्देशित व्यक्तींचे नाव	पत्ता	नामनिर्देशित व्यक्तीचे कर्मचाऱ्याशी असलेले नाते	जन्म तारीख	प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीला प्रदान करावयाच्या जमा रकमेतील संचित रकमेच्या हिश्याची एकूण रक्कम	जर नामनिर्देशित व्यक्ती अज्ञान असेल तर, अज्ञान असल्याच्या कालावधीत जिला रक्कम मिळू शकेल त्या पालकाचे नाव, नातेसंबंध व पत्ता
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)

१. असे प्रमाणित करण्यात येते की, माझे कुटुंब नाही आणि जर यानंतर माझे कुटुंब झाल्यास, वरील नामनिर्देशन आपोआप रद्द असल्याचे मानण्यात येईल.

२. असे प्रमाणित करण्यात येते की, माझे वडील/आई माझ्यावर अवलंबून आहेत.

३. जे लागू नसेल ते खोडा.

कर्मचाऱ्याची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा

नियोक्त्याचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, माझ्या आस्थापनेमध्ये काम करीत असलेल्या श्री/ श्रीमती/ कुमारी..... याने/ हिने, त्याने/तिने, नोंद/नोंदी वाचल्यानंतर अथवा त्याला/तिला मी नोंद/नोंदी वाचून दाखविल्यानंतर आणि त्याने/तिने प्रत्येक प्रकरणाची खात्री केल्यानंतर, वरील नामनिर्देशन माझ्या समक्ष स्वाक्षरी करून / अंगठा लावून केले आहे.

नियोक्त्याची किंवा आस्थापनेच्या अन्य प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम.

ठिकाण: _____

दिनांक: _____

कारखान्याचे/आस्थापनेचे नाव व पत्ता आणि शिक्का.

कर्मचाऱ्याकडून पोचपावती

मी दाखल केलेल्या आणि नियोक्त्याने रीतसर प्रमाणित केलेल्या नमुना- सात मधील नामनिर्देशनाची दुसरी प्रत मिळाली.

दिनांक:

कर्मचाऱ्याची सही.

नमुना- आठ

(नियम ३८(२) आणि नियम ३९(२) पहा)

भाग - अ

कलम ४५ च्या पोट-कलम (५) अन्वये प्राधिकाऱ्याने प्रतिवादीला द्यावयाच्या नोटिशीचा नमुना

(अर्जाचे शीर्षक)

प्रति,

नाव: _____

पत्ता: _____

ज्या अर्थी,..... (अर्जदाराचे नाव) याने/हिने, वेतन संहिता,२०१९ अन्वये माझ्याकडे वरील अर्ज दाखल केलेला आहे, त्याअर्थी, तुम्हाला, याद्वारे, व्यक्तिशः किंवा यथोचित प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीद्वारे माझ्यासमोर उपस्थित राहण्यासाठी समन्स देण्यात येत आहे, आणि अर्जाशी संबंधित असलेल्या सर्व सारभूत प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी फर्माविण्यात येत आहे, अथवा अर्जातील दाव्याचे उत्तर देण्यासाठी तुम्ही यथोचित प्राधिकृत केलेल्या व अशा प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी सक्षम असलेल्या कोणत्याही व्यक्तींसोबत दिनांक .....२०... रोजी .....सकाळी/दुपारी वाजता उपस्थित रहावे आणि अर्ज अंतिम स्वरूपात निकालात काढण्याकरिता उपस्थित राहण्यासाठी दिवस निश्चित केलेला असल्याने, तुमच्या बचावासाठी ज्यांच्या साक्षीवर व ज्या कागदपत्रांवर अवलंबून राहण्याचा तुमचा इरादा आहे ते सर्व साक्षीदार व ती कागदपत्रे त्या दिवशी सादर करण्यासाठी तुम्ही तयार असले पाहिजे.

जर यात वर नमूद केलेल्या दिवशी तुम्ही हजर राहण्यात कसूर केली तर, तुमच्या अनुपस्थितीत, अर्जाची सुनावणी करण्यात येईल व अर्ज निकालात काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ठिकाण: _____

दिनांक: _____

प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का.

भाग - ब

कलम ४९ च्या पोट-कलम (१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्याने प्रतिवादीला द्यावयाच्या नोटिशीचा नमुना

(अपिलाचे शीर्षक)

प्रति,
नाव: _____
पत्ता: _____

याची नोंद घ्यावी की, (अपीलकाराचे नाव) याने/हिने, वेतन संहिता, २०१९ याच्या कलम ४९ अन्वये या अपिलीय प्राधिकाऱ्यासमोर अपील (ज्याची प्रत सोबत जोडली आहे) सादर केले आहे, आणि अपीलाच्या सुनावणीसाठी या अपिलीय प्राधिकाऱ्याने .....२०..... हा दिवस निश्चित केला आहे.

जर तुम्ही व्यक्तिशः किंवा तुमच्या वतीने काम करण्यासाठी रीतसर प्राधिकृत प्रतिनिधी या अपीलामध्ये उपस्थित राहिला नाही तर, तुमच्या अनुपस्थितीतच त्यावर सुनावणी करण्यात येईल व निर्णय घेण्यात येईल.

ठिकाण: _____
दिनांक: _____

अपिलीय प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का.

नमुना- नऊ

(नियम ४०(१)(तीन) पहा)

उपस्थिती नोंदवही- नि- हजेरीपट

आस्थापनेचे नाव:	
नियोक्त्याचे नाव:	
मालकाचे नाव:	
आस्थापनेचा नोंदणी क्रमांक:	
(आस्थापनेचा नोंदणी क्रमांक हा, कामगार ओळख क्रमांक (LIN) असेल)	
.....महिन्यासाठी	

अ.क्र.	कर्मचारी संकेतांक	नाव	पदनाम	पाळी	कार्यस्थळ / कक्ष/ विभाग
१	२	३	४	५	६

उपस्थिती दिनांक व वेळ (७)

तारीख	१		२		३		४		५		६		७		८		९		१०		११	
	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन
वेळ																						
सही																						

तारीख	१२		१३		१४		१५		१६		१७		१८		१९		२०		२१		२२	
	आ	नि	आ	नि	आ	नि	आ	नि	आ	नि	आ	नि	आ	नि	आ	नि	आ	नि	आ	नि	आ	निर्गमन

	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	गमन	
वेळ																						
सही																						

तारीख	२३		२४		२५		२६		२७		२८		२९		३०		३१	
	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन	आगमन	निर्गमन
वेळ																		
सही																		

काम केलेल्या दिवसांची एकूण संख्या	काम केलेल्या अतिकालिक तासांची एकूण संख्या	कामाच्या ठिकाणाबाहेरील, कोणत्याही असल्यास, दौऱ्याचा किंवा सोपवलेल्या कामाचा संक्षिप्त ततपशील	*नोंदवहीपालाची सही
(८)	(९)	(१०)	(११)

*टीप: जर नोंदवही प्रत्यक्षरित्या ठेवलेली असेल तर, स्वाक्षरी आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आय. ए. कुंदन,
शासनाच्या अपर मुख्य सचिव.

LABOUR DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated the 5th November, 2026.

NOTIFICATION

CODE ON WAGES, 2019.

No. COW-0126/C.R.09/Lab7.- In exercise of the powers conferred by section 67 of the Code on Wages, 2019 (29 of 2019), and of all other powers enabling it in that behalf and in supersession of the Maharashtra Minimum Wages Rules, 1963 made under the Minimum Wages Act, 1948 (11 of 1948) and the Maharashtra Payment of Wages Rules, 1963 made under the Payment of Wages Act, 1936 (4 of 1936), the Government of Maharashtra hereby makes the following rules, the same having been previously published as required by sub-section (1) of section 67 of the said Code, namely :—

CHAPTER I

PRELIMINARY

1. ***Short title, extent and commencement.—***(*1*) These rules may be called the Maharashtra Wage Rules, 2026.

(*2*) They extend to the whole of the State of Maharashtra.

(*3*) They shall come into force on the date of their publication in the *Official Gazette*.

2. Definitions.—(1) In these rules, unless the subject or context otherwise requires,—

(*a*) "appeal" means an appeal preferred under sub-section (1) of section 49 ;

(*b*) "appellate authority" means the appellate authority appointed by the State Government under sub-section (1) of section 49 ;

(*c*) "authority" means the authority appointed by the State Government under sub-section (*1*) of section 45 ;

(*d*) "Board" means the Maharashtra State Advisory Board constituted by the State Government under sub-section (4) of section 42 ;

(*e*) "Chairperson" means the Chairperson of the Board ;

(*f*) "Code" means the Code on Wages, 2019 (29 of 2019) ;

(*g*) "Committee" means a committee appointed by the State Government under clause (a) of sub-section (1) of section 8.

(*h*) "day" means a period of twenty four hours beginning at mid-night ;

(*i*) "electronically" means any information submitted by email or maintained or displayed on the designated portal or mobile application or website or digital payment in any mode for the purposes of the Code ;

(*j*) "Form" means a form appended to these rules ;

(*k*) "highly skilled occupation" means an occupation which calls in its performance a specific level of perfection and required competence acquired through intensive technical or professional training or practical occupational experience for a considerable period and also requires of an employee to assume full responsibility for his judgement or decision involved in the execution of such occupation;

(*l*) "Inspector-cum-Facilitator" means a person appointed by the State Government, by notification under sub-section (1) of section 51 ;

(*m*) "member" means a member of the Board and includes its Chairperson ;

(*n*) "registered trade union" means a trade union registered under the Industrial Relations Code, 2020 (35 of 2020) ;

(o) "Schedule" means the Schedule annexed to these rules;

(p) "section" means a section of the Code;

(q) "semi-skilled occupation" means an occupation which in its performance requires the application of skill gained by the experience on job which is capable of being applied under the supervision or guidance of a skilled employee and includes supervision over the unskilled occupation;

(r) "skilled occupation" means an occupation which involves skill and competence in its performance through experience on the job or through training as an apprentice in a technical or vocational institute and the performance of which calls for initiating and judgement;

(s) "State Government" means the Government of Maharashtra;

(t) "unskilled occupation" means an occupation which in its performance requires the application of simply the operating experience and involves no further skills.

(2) Words and expressions used in these rules and not defined herein, but are defined in the Code shall have the same meanings as are respectively assigned to them under the Code.

CHAPTER II
MINIMUM WAGES

3. Manner of calculating minimum rate of wages. – *(1)* For the purposes of sub-section (5) of section 6, the minimum rate of wages shall be fixed by the day basis keeping in view the criteria , which shall be separately specified by the State Government by special or general order:

Provided that the State Government shall not fix the minimum wages of the State Government employees under this Code.

(2) When the rate of wages for a day is fixed, then, such amount shall be divided by eight for fixing the rate of wages for an hour and multiplied by twenty six for fixing the rate of wages for a month and in such division and multiplication the factors of one-half and more than one-half shall be rounded as next figure and the factors less than one-half shall be ignored.

(3) In case there is less than six days working week, the hourly rate of minimum wages so calculated shall be used to derive the minimum wages for the day.

4. Interval for revision of variable dearness allowance. - The cost of living allowance and the cash value of the concession in respect of essential commodities at concession rate shall be computed once before the 1st April and then before the 1st October in every year to revise the variable dearness allowance payable to the employees on the minimum wages considering the Average Consumer Price Index Number for Industrial Workers published by the Labour Bureau, Ministry of Labour and Employment, Government of India.

5. Number of hours of work which shall constitute a normal working day.- *(1)* The number of hours of work which shall constitute a normal working day for an employee whose wage period is on a daily basis shall be eight hours and interval for rest shall be in accordance with the notification issued in this regard under the Occupational Safety, Health and Working Conditions Code, 2020 (37 of 2020).

(2) The number of hours of work which shall constitute a normal working day for an employee whose wage period is other than on a daily basis shall be so fixed that the total number of weekly working hours shall not exceed forty-eight hours.

6. Weekly day of rest.- *(1)* Subject to the provisions of this rule, an employee shall be allowed rest of one day or more than one day, as the case may be, every week (hereinafter referred to as "the rest days") which in case of six day week shall ordinarily be Sunday and in case of less than six day week shall include Saturday and Sunday, but the employer may fix any other days of the week as the rest days for any employee or class of employees.

Provided that, in a six day working week or less than six day working week, as the case may be, the remaining days of the week shall be paid rest days for such employees:

Provided further that, an employee shall be entitled for the rest days under this sub-rule, if he has worked under the same employer in case of six day week for a continuous period of not less than six days and in case of less than six day working week, for a continuous period of the stipulated number of working days, as the case may be:

Provided further that, the employee shall be informed of the days fixed as the rest days and of any subsequent change in the rest days before the change is effected, by

display of a notice to that effect at a conspicuous place in the place of employment or electronically.

Explanation.- For the purpose of computation of the continuous period of not less than six days or the stipulated continuous period of not less than six days or the stipulated number of working days in a week specified in the second proviso in this sub-rule,-

(a) any day on which an employee is required to attend for work but is given only an allowance for attendance and is not provided with work;

(b) any day on which an employee is laid off on payment of compensation under the Industrial Relations Code, 2020 (35 of 2020); and

(c) any leave or holiday, with or without pay, granted by the employer to an employee in the period of six days or during the stipulated number of working days of a week as the case may be, immediately preceding the rest days, shall be deemed to be days on which the employee has worked.

(2) Any such employee shall not be required or allowed to work on the rest day unless he has or will have a substituted rest day for a whole day on one of the working days in a week immediately before or after the rest day:

Provided that, no substitution shall be made which will result in the employee working for more than ten days consecutively without a rest day for a whole day.

(3) Where in accordance with the foregoing provisions of this rule, any employee works on a rest day and has been given a substituted rest day on any one of the working days before or after the rest day, the rest day shall, for the purpose of calculating the weekly hours of work, be included in the week in which the substituted rest day occurs.

(4) An employee shall be granted for rest day wages calculated at the rate applicable to the previous working day and where he works on the rest day and has been given a substituted rest day, then, he shall be paid wages for the rest day on which he worked, at the overtime rate and wages for the substituted rest day at the rate applicable to the previous working day:

Provided that, in case of six day week where,-

(i) the minimum rate of wages of the employee as notified under the Code has been worked out by dividing the minimum monthly rate of wages by twenty-six; or

(ii) the actual daily rate of wages of the employee has been worked out by dividing the monthly rate of wages by twenty-six and such actual daily rate of

wages is not less than the notified minimum daily rate of wages of the employee,

then, no wages for the rest day shall be payable; and

(iii) the employee works on the rest day and has been given a substituted rest day, then, he shall be paid, only for the rest day on which he worked, an amount equal to the wages payable to him at the overtime rate, which shall not be less than twice the normal rate of wages;

and, if any dispute arises whether the daily rate of wages has been worked out in accordance with the provisions of this proviso, the Commissioner of Labour, Maharashtra State or the office in-charge having geographical jurisdiction may, on application made to him in this behalf, decide the same, after giving an opportunity to the parties concerned to make written representations:

Provided further that, in case of an employee governed by a piece-rate system, he shall be paid wages for the rest day on which he works, at the overtime rate and wages for the substituted rest day at the rate applicable to the previous working day.

Explanation.-In this sub-rule "previous working day" means the last day on which the employee has worked, which precedes the rest day or the substituted rest day, as the case may be; and where the substituted rest day falls on a day immediately after the rest day, the previous working day means the last day on which the employee has worked, which precedes the rest day.

(5) The provisions of this rule shall not operate to the prejudice of more favourable terms, if any, to which an employee may be, entitled under any other law or under the terms of any award, agreement or contract of service, and in such a case, the employee shall be entitled only to more favourable terms aforesaid.

Explanation.- For the purposes of this rule, 'week' shall mean a period of seven days beginning at midnight on Saturday night.

7. Night shifts.- Where an employee in an employment works on a shift which extends beyond midnight, then,-

(a) a rest day for the whole day for the purposes of rule 6 shall, in this case means a period of twenty-four consecutive hours beginning from the time when his shift ends; and

(b) the following day in such a case shall be deemed to be the period of twenty-four hours beginning from the time when such shift ends, and the hours after midnight during

which such employee was engaged in work shall be counted towards the previous day.

